Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातीअंत निर्मूलन संबंधी विचार

**संशोधक**
**प्रा. पंकज भाऊरावजी नागदेवे**
ईमेल आयडी: pankajybn@gmail.com
मोबाइल क्रमांकः ९७६६६९१०४३

**मार्गदर्शक**
**डॉ. राष्ट्रपाल एस. गणवीर**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र
महिला महविद्यालय, नंदनवन, नागपूर

---

## विषय प्रवेश :

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातीअंत निर्मूलन असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ भारतातच नाही तर संपूर्ण विश्वामध्ये "The Knowledge of Personality" या नावाने ओळखले जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकर बाराशे वर्ष पारतंत्र्यात असणाऱ्या देशातील तळागळातील जाती, धर्म, पथ, वर्ग, भाषेच्या लोकांना स्वतंत्र, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची ओळख करून दिली एकढेच नाही तर हजारो वर्षापासून वर्गव्यवस्थेच्या जोखंडामध्ये खितपत पडलेल्या समाजाला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला त्यामुळे आज भारत हा जगातील पाचवी महासत्ता म्हणून ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब अंबेडकर विज्ञानवादी, भौतिकवादी, प्रागतिक सुधारणावादी, अर्थशास्त्रज, प्रखर राष्ट्रवादी एकढेच नाही तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बहुजनांचे कैवारी अशा अनेक नावाने ओळखल्या जाते हे त्रिकालबाधित सत्य आहे. प्रस्तुत शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जाति अंत व निर्मुलनासंबंधी विचारावर प्रस्तुत शोध निबंध राहील

## प्रस्तावना :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख एक मोठे विचारवंत, विद्वान, उच्चविद्याविभूषित, कायदेपंडित, भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार, अस्पृश्यांची सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी व त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी जीवनभर संघर्ष करणारे नेते अशी असली तरी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्र होते. बाबासाहेबांनी भारतीय समाज व्यवस्थेचे समाजशास्त्रीय अध्ययन करून भारतातील समाजशास्त्रीय अध्ययनाला चालना दिली. जाती व्यवस्थेच्या संदर्भात अत्यंत सखोल व सुक्ष्मपणे शास्त्रीय अध्ययन करण्याचे श्रेय डॉ. आंबेडकराचे आहे.

सामाजिक विषयांच्या संदर्भात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक ग्रंथ लिहले आहेत. सामाजिक विषयाच्या बाबतीत त्यांनी केवळ वरवरचे लेखन केले नाही तर, वस्तूनिष्ठपध्दतीने संशोधनात्मक मार्गाचा अवलंब करून अनेक महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय सिध्दांत मांडले आहेत. म्हणून डॉ. आंबेडकर हे केवळ एक सामाजिक विचारवंत नसून ते एक थोर समाजशास्त्रज्ञ होते. तसेच ते एक संशोधक होते यात शका नाही. कोलंबिया, ऑक्सफर्ड, बॉन या जगप्रसिद्ध विद्यापीठात त्यांनी अध्ययन केले संशोधनपर प्रबंध लिहले त्यामुळे त्यांच्या विचारामध्ये वस्तूनिष्ठता व तर्कसंगतपणा आढळतो. सामाजिक विषयाच्या संदर्भात त्यांनी स्वतंत्र अशा सिध्दांतांची माडणी केली. जातीव्यवस्थेसंबंधीचा सिध्दांत, अस्पृश्यतेसंबंधीचा सिध्दांत, सामाजिक

परिवर्तनाचा सिध्दांत, धर्माचा सिध्दांत, सामाजिक मानवतावादाचा सिध्दांत इ. सिध्दांत बाबासाहेबांनी आपल्या ग्रंथात मांडलेत.

सदर लेखात डॉ. आंबेडकरांचे जातिव्यवस्थे संबंधीचे विचार कसे होते याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातिअंत निर्मूलन संबंधी विचार

**उद्दिष्ट :**

जाती आणि त्याचे निरमूलनासंबंधी विषयाचे अध्ययन अर्थपूर्ण होण्यासाठी चिकित्सक पद्धतीच्या आधारे पुढील उिद्दष्टे निश्तिच करण्यात आली.

१. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जाती निर्मिती संबंधी विचार स्पष्ट करणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन भारतीय समाज व्यवस्थेची स्थिती जाणून घेणे.

**भारतातील जातीची जडण घडण आणि विकास :**

भारतात जातीचा उदय कसा झाला, जाती टिकून कशा राहिल्या या संबंधी डॉ. आंबेडकर यांनी सखोल चिंतन केले आहे. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात ९ मे १९१६ साली भरलेल्या डॉ.ए.ए. गोल्डनवायझर मानवशास्त्रीय परिषदेत बाबासाहेबांनी भाग घेऊन, 'भारतातील जातीचे घडण, उत्तपत्ती आणि विकास' हा संशोधन पेपर सादर केला होता. या सशोधन पेपर मध्ये जाती कशा निर्माण झालात? य संबंधी मानवशास्त्रीय व समाजशास्त्रीय विश्लेषण केलेले आहे. जातिव्यवस्थेचे विश्लेषण डॉ. आंबेडकर पुढीलप्रमाणे करतात. प्राचीन काळी भारतात १) ब्राह्मण २) क्षत्रिय ३) वैश्य ४) शूद्र सुरुवातीच्या काळात वरील चारच वर्ण होते. परंतु नंतरच्या काळात त्या चार जाती बनल्या आणि नंतर या चार जातीच्या शेकडो जाती बनल्या अशा प्रकारे सद्याची जाती व्यवस्था ही प्राचीन वर्णव्यवस्थेची उत्क्रांती आहे असे म्हटले जाते. पण वर्णव्यवस्थेचा अभ्यास करून जातीव्यवस्थेची कल्पना येत नाही म्हणून वर्णपध्दती बाजूला ठेवूनच जाती व्यवस्थेचा अभ्यास करावा लागतो असे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात.

पाश्चात्य विद्वान व भारतीय विद्वान या दोघांनीही तिच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संदर्भात नेसफिल्ड (Nesfield) आणि सर एच. रिस्ले (Sir H. Risley) या दोन पाश्चात्य विद्वानांचा बाबासाहेब है विशेषत्वाने उल्लेख करतात. नेसफिल्डच्या मते, 'जात म्हणजे असा एक समुदाय की जो इतर कोणत्याही समुदायाशी संबंध ठेवत नाही. स्वतःच्या समुदायाशिवाय इतर कोणत्याही समुदायाशी वैवाहीक संबंध निर्माण करीत नाही. इतकेच नव्हे तर इतर समुदायाशी खाणेपिणेही तो टाळतो. सर एच. रिस्ले यांच्या मते जातीची व्यवच्छेदक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) कुटुंबाचा किंवा कुटुंबांच्या गटांचा असा एक समूह की ज्याने एक सामुदायिक नाव धारण केलेले असते.
(२) ज्याचा एक सामुदायिक व्यवसाय असतो.

(३) जे कोणातरी ऐतिहासिक किंवा काल्पनिक महापुरुषाचे वंशज आहोत असे मानतात.

(४) जे वंश परंपरेने तोच व्यवसाय करतात.

भारतीय विद्वानांमध्ये डॉ. श्रीधर केतकरांचे नाव विशेषत्वाने घेतले जाते. ते एक ख्यातनाम समाजशास्त्रज्ञ होते. त्यांच्यामते 'जात' हा असा एक समूह असतो की जो इतर कुठल्याही समूहाशी वैवाहिक संबंध ठेवीत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या विद्वानांची मते ग्राह्य मानली आहेत. जातनिर्मितीमध्ये विवाह हा महत्त्वाचा घटक आहे. जात ही असमावेशक (Exclusive) असते. जात्यंतर्गत विवाह हाच जातीचा आधार आहे. जातींना पवित्र अपवित्रतेच्या कल्पना चिकटविण्यात आल्या आहेत. त्यातून उच्च-नीचता निर्माण झाली. ज्या अंतर्गत विवाहामुळेच जात आणि जातिप्रथा टिकून आहे. आणि खरेतर हाच मुद्दा डॉ. आंबेडकरांनी आपल्या Castes in India: Their Mechanism, Genesis and Development' (1916) या शोध निबंधात प्रकर्षाने मांडला आहे. "Thus the superimposition of en- dogamy over exogamy means the creation of caste." 'जात म्हणजे एक सामाजिक सघटन होय अशी जातीची व्याख्या करता येईल. जातीच्या नियमनात पुढील चार गोष्टीचा समावेश होतो. १) सामाजिक श्रध्दा २) विवाह ३) भोजन ४) व्यवसाय, विविध जातीचा परस्परात कोणताही संबंध नसतो प्रत्येक जात स्वतंत्र असते. जातीचे अंतर्गत व्यवहार हे प्रत्येक जातीच्या नियमानुसार ठरविले जातात. जात असमानतेवर आधारित आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ असते. जात ही वर्ण व्यवस्थेची उत्क्रांती आहे असे म्हटले जाते, परंतु डॉ. आंबेडकरांना ही गोष्ट मान्य नाही. त्यांच्यामते जात हा वर्णाचा विपर्यास असून कोणत्याही प्रकारे बघितल्यास ती विरुध्द गतीने झालेल उत्क्रांती होय, जातीच्या घडणे संबंधीचे विश्लेषण करताना डॉ. आंबेडकरांनी जातीची उत्तपत्ती किंवा उगमासंबंधीचा सिध्दांत मांडला आहे. जातीच्या उत्तपती संबंधीचे विश्लेषण हे जाती अंतर्गत विवाहाशी संबंधित आहे. "जाती अंतर्गत विवाह हेच जातीचे एकमेव वैशिष्ट होय." भारतीय समाजात विवाहाच्या संदर्भात अत्यंत कठोर असे नियम आहेत. हे नियम हिंदू समजात प्रत्यक्ष व्यवहारात आढळून येतात. विवाहाच्या बाबतीत हिंदू समाज हा परंपरावादी असून एक जात दुसऱ्या जाती बरोबर कोणत्याही प्रकारचे वैवाहिक संबंध ठेवित नाही. इतकेच नव्हेतर, कोणतीही व्यक्ती याचे उल्लंघन करु शकत नाही. आंतरविवाहाचे कठोर नियम हेच जातीव्यवस्थेचे प्रमुख कारण आहे.

जातीची निर्मिती ज्याअंतर्गत विवाहामुळेच झाली आणि त्यामुळेच ती टिकून आहे. कुठल्याही समाजात विविध स्तर (stratification) हे असतातच. त्या स्तरीकरणातून जाती व वर्ग निर्माण होतात. जन्माधिष्ठित स्तरीकरणातून जाती निर्माण झाल्या आणि त्यांना शाश्वत असे स्वरूप प्राप्त झाले. वर्ग हे जन्माधिष्ठित नाहीत व नसतात, म्हणून ते बदलता येतात. भारतीय समाजात जातीही आहेत आणि वर्गही आहेत. पण जन्माधिष्ठतेमुळे जाती ह्या अपरिवर्तनीय ठरल्या, पण वर्ग हे परिवर्तनीय आहेत. जाती आणि वर्ग यातील हा एक फरक आहे. म्हणून "A Caste is an Enclosed Class" असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे.

जात्यंतर्गत विवाहांच्या ऐवजी आंतरजातीय विवाह (Endogamy) केले तर जात व जातिप्रथा नामशेष होईल ही गोष्ट उघड आहे. पण याला लोकांचा विरोध आहे. कारण त्यामागे त्यांचे हितसंबंध, अज्ञान आणि

अंधविश्वास दडून बसलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाच विषय Annihilation of Caste (1936) या पुस्तकात चर्चिला आहे. हिंदू समाज ही एक काल्पनिक कथा आहे. अर्थात ते एक 'मिथ' आहे. जात है या समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. हिंदू समाज हा आभास (Illusion) आहे आणि जात है वास्तव आहे आणि हे वास्तव चिरंतनपणे हिंदू समाजाला चिकटलेले आहे. ते अभंग आहे. जात हा एक विषवृक्ष आहे. त्याच्यावर जिथे घाव घालाल तिथून फांद्या फुटतात. जात ही एक विघातक आणि विघटनकारी शक्ती आहे.

हिंदू समाजाला शतकानुशतकांपासून जातिव्यवस्थेने विषारी विळखा घातलेला आहे. त्याला तोडण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पण तो तुटता तुटत नाही. जात ही कशी निर्माण झाली, कुणी निर्माण केली आणि तिचे पालनपोषण कुणी केलें यावर अनेकांनी संशोधन करून ग्रंथ लिहिले आहेत. जात ही माणसाने निर्माण केली आणि माणसानेच तिचे पालनपोषण केले ही गोष्ट उघड आहे. असे म्हटले जाते की, माणसाने निर्माण केलेली समस्या ही माणूसच सोडवू शकतो. जातीची समस्या मात्र माणसाला सोडवता आलेली नाही. वरचेवर ती क्लिष्ट होत चालली आहे. जातिव्यवस्था ही अभेद्य अशी व्यवस्था आहे. काहींना तिने डोक्यावर घेतलेले आहे तर काहींना तिने पायदळी तुडवले आहे. जे तिच्या डोक्यावर बसलेले आहेत ते तिचा गौरव करतात. जे तिच्या पायाखाली आहेत त्यांना ती नामशेष झाली पाहिजे असे वाटते जातिव्यवस्थेत माणसाला किंमत नाही, तर ती त्याच्या जातीला आहे. माणूस कितीही कर्तृत्वसंपन्न असो, त्याची जात ही त्याच्या कर्तृत्वापेक्षा मोठी असते. अस्पृश्यता हे जातिव्यवस्थेचे निकृष्ट असे रूप आहे. तिने समाजाच्या एका मोठ्या भागालाच माणुसकी नाकारली. जात ही जन्माधिष्ठित असल्यामुळे अस्पृश्यांच्या अनेक पिढ्यांचे तिने अमानुषीकरण केले. जातिव्यवस्थेवर अनेकानी प्रहार केले पण ती अभंगच राहिली. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ आणि आधुनिक काळ या तिन्ही काळावर तिने मात केली आहे. या तिन्ही काळात जातिनिर्मूलनाचे प्रयत्न झाले. पण या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. जात आणि जातिव्यवस्था हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अभ्यासाचा, संशोधनाचा व चिंतनाचा विषय होता. अस्पृश्यतेचे चटके त्यांना बसले होते. पावलोपावली त्यांच्या मार्गात जात आडवी येत होती. जातीनेच त्यांना अंतर्मुख बनविले होते आणि आक्रमकही. म्हणून जातिप्रथेचे विध्वसन कसे करावे हा विचार त्याच्या मनात आयुष्यभर घोळत राहिला. जातीचे चटके सर्वाधिक बसले ते अस्पृश्यांना आणि म्हणून प्रत्येक अस्पृश्याच्या मनात जात आणि जातिप्रथा विध्वंसनाचा विचार आल्याशिवाय राहिला नाही.'

कोलंबिया विद्यापीठात शिकत असतांना बाबासाहेबांनी 'भारतातील जाती' या मथळ्याखाली एक विचार प्रवर्तक शोधनिबंध लिहिला. त्यात जात या संस्थेची व प्रथेची त्यांनी खोलात जाऊन शल्यचिकित्सा केली. त्यानंतरही त्यानी जात आणि जातिप्रथेवर चिंतनपर बरेच लिखाण केले. इतकेच नव्हे तर त्यांनी जात व जातिसंस्थेच्या विध्वंसनाचा आयुष्यभर प्रयत्न केला. Annihilation of Caste या पुस्तकात त्यांनी जातिप्रथेच्या विध्वंसनाची रणनीती सांगितली आहे.

वास्तविक हे पुस्तक पंजाब प्रांतातील जात-पात-तोडक मंडळाच्या १९३५ साली लाहोर येथे आयोजित केलेल्या वार्षिक अधिवेशनासाठी लिहिलेले अध्यक्षीय भाषण आहे. पण त्यातील काही मुद्दे या मंडळाच्या मंडळींना विवादास्पद वाटल्यामुळे नियोजित अधिवेशन झालेच नाही. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे भाषण पुस्तक रुपाने छापले, हे पुस्तक लहान असले तरी त्यातले विचार मात्र महान आहेत. नव्हे, ते अतिशय स्फोटक व

क्रांतिकारक आहेत. घाव घालून जग बदलणारे ते विचार आहेत. जातिपद्धती ही ज्यावर आधारलेली आहे त्या धार्मिक कल्पना नामशेष केल्याशिवाय जाती तोडणे शक्य नाही. हा या भाषणाचा गाभा आहे.

जात-पात-तोडक मंडळ हे जात आणि जातिप्रथा तोडण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेले मंडळ होते, पंजाबमध्ये काही ध्येयवादी आर्यसमाजी तरुणांनी स्थापन केलेले ते मंडळ होते. समाज सुधारण्याचा त्यांचा हा प्रयत्न स्तुत्य होता. म्हणूनच त्यांनी डॉ. आंबेडकरांना अध्यक्षपद दिले होते. आमूलाग्र समाज सुधारणेच्या ध्येयाने डॉ. आबेडकरांना नेहमीच प्रेरित केलेले होते. म्हणूनच त्यांनी जात-पात-तोडक मंडळाच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारले होते.

समाजव्यवस्थेकडे कोणाला तरी दुर्लक्ष करता येईला का? भारतीय समाजव्यवस्थेतून अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. भारतीय समाजव्यवस्था ही मुळात चातुर्वर्ण्यवर व पर्यायाने जातींवर आधारलेली आहे. वैदिक काळात चातुर्वर्ण्य हे गुणकर्मावर आधारलेले होते. नंतर ते जन्मावर आले, नव्हे आणले गेले. आजची जातिव्यवस्था ही जन्मावर आधारलेली आहे. या व्यवस्थेने अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. त्यामागे उच्चवर्णीयांचे हितसंबंध होते ही गोष्ट उघड आहे. अस्पृश्यता ही देखील याच व्यवस्थेची निर्मिती आहे. जातिव्यवस्थेचा मनोरा आजही अभंग व अभेद्य आहे. जाती ह्या या मनोऱ्यात असणारे निरनिराळे कप्पे आहेत. एका कप्प्यातून दुसऱ्या कप्प्यात जाता येत नाही. या कप्प्यांना ना दारे आहेत ना खिडक्या, कप्प्यातच जन्मावे, कप्प्यातच मरावे, काही कप्पे चांगले आहेत पण बहुसंख्य निकृष्ट आहेत. निरनिराळ्या कप्प्यात राहणाऱ्या लोकांचे प्रश्न कसे सोडवणार ? आणि ते सोडवायचे असतील तर जातिव्यवस्थेकडे दुर्लक्ष करून सोडवता येतील का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर हाच प्रश्न होता. ही व्यवस्था नष्ट केल्याशिवाय तिच्यातून निर्माण झालेले प्रश्न सोडवता येणार नाहीत हे त्यांनी निक्षून सांगितले आहे.

जातिव्यवस्थेला दुर्लक्षून किंवा तिने निर्माण केलेली गुंतागुंत लक्षात न घेता ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न निरनिराळ्या विचारधारांच्या लोकानी केलेला आहे. पण अशा लोकांच्या पदरात यश पडलेले नाही. त्यांच्या अपयशाबद्दल बाबासाहेबांनी Annihila- tion of Caste या पुस्तकात सखोल चर्चा केलेली आहे. प्रथम ते समाजवाद्यांकडे वळतात. समाजवाद हा अर्थकारणावर भर देतो. समाजवादी है आर्थिक दृष्टिकोनातून इतिहासाचा अर्थ लावतात. ते सामाजिक सुधारणांना फारसे महत्त्व देत नाहीत. संपती हाच सत्तेचा एकमेव स्तोत्र आहे असे ते मानतात. खाजगी सपत्ती हेच अनेक प्रश्नांचे मूळ आहे अशी त्यांची धारणा आहे. संपत्तीच्या समानीकरणातून सर्व प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते असा त्यांचा दावा आहे. मनुष्य हा एक आर्थिक प्राणी आहे आणि म्हणून तो आर्थिक परिस्थितीशी निगडीत आहे. त्याचे आर्थिक प्रश्न सोडविले तरच तो बंधमुक्त होईल असे त्यांचे प्रतिपादन आहे.

भारतातील जातीप्रथा ही हिंदू धर्मावरील एक कलंक आहे, असे न मानता जातीप्रथा (अस्पृश्यता) हा शूद्रांच्या नरदेहावरी कलंक समजून हो जातीप्रथा नष्ठ करून कोट्यावधी अस्पृश्य बांधवांना समतेचे, मानवतेचे, माणूसकीचे जीवन जगता यावे म्हणून बाबासाहेबांनी खूप प्रयत्न केले. १९२४ मध्ये 'बहिष्कृत हिताकरिणीसभा' सभा स्थापन करून अस्पृश्य समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्विकारला. १९२७ रोजी

महाड येथे चवदारतळ्याचा सत्याग्रह केला. १९३० रोजी नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेशाचा लढा सुरु केला. इंग्लंड मध्ये झालेल्या गोलमेज परिषदेत भाग घेऊन भारतातील अस्पृश्यांची दु:खे जगाच्या वेशीवर टांगली. वेगवेगळी वृत्तपत्रे काढून अस्पृश्यांच्या दु:खांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. तरीही जातीप्रथा नष्ट होण्याच्या मार्गावर नाही असे दिसल्यावर त्यांनी १९३५ च्या येवला परिषदेत धर्मांतराची घोषणा केली.

**जातिभेद निर्मूलन :**

डॉ. आंबेडकरांनी हिंदूसमाजातील वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था यांच्या दुष्परिणामांची मीमांसा करून जातिभेद निर्मूलनाच्या दृष्टीने मूलगामी विचार मांडले आहेत. भारतातील जाती (Cast in India) आणि जातिभेद निर्मूलन (Annihilation of Cast) या दोन प्रबंधाद्वारे त्यांनी आपले विचार मांडले आहेत. जानेवारी १९३६ मध्ये लाहोर च्या जातपात तोडक मंडळाच्या वार्षिक संमेलनात जे अध्यक्षीय भाषण डॉ. आंबेडकर करणार होते. त्या भाषणाची नंतर एक पुस्तिका छापली (Annihilation of Cast) त्यात त्यांनी जातिभेद निर्मूलनांची मिमांसा केली आहे. हिंदू समाज हा प्रारंभी चार वर्णात विभागला होता. वर्ग हा माणसाच्या स्वत्तावर आधारलेला असे. कांही काळानंतर वर्ण हा जातीवर आधारला गेला, चार वर्णाचे रुपांतर चार जातीत झाले. जातिभेद व्यवस्था ही एकाच वंशाच्या लोकांची सामाजिक विभागणी आहे. ती केवळ श्रमाची विभागणी करते असे नाही तर ती श्रमिकाची सुध्दा विभागणी करते. हिंदू समाजाची चातुर्वर्ण्य व्यवस्थेला अशी खोड आहे की तिचा अपकर्ष निरनिराळ्या जाती बनण्यातच होतो.

हिंदू समुहाच्या हानीचे मुळ कारण जातिभेदात आढळते. हिंदूच्या अवनतीस, पराभवास जातिव्यवस्था कारणीभूत आहे. डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक' व 'बहिष्कृतभारत' या वृत्तपत्रात जातिभेद निर्मूलनांची मिमांसा केली आहे. जातिव्यवस्थेला अनेक मजले असलेल्या परंतु जिना नसलेल्या मनोऱ्याची उपमा दिलेली आहे. ज्या मजल्यात जन्मावे त्याच मजल्यात मरावे अशी तटबंदी जाती व्यवस्थेत असते. वरिष्ठ जातीतील व्यक्ती कितीही नालायक असली तरी तिला कनिष्ठ जातीत ढकलले जात नाही व कनिष्ठ जातीतील व्यक्ती कितीही लायक असली तरी तिला वरिष्ठ जातीत जाता येत नाही जातिप्रथेमुळे हिंदूस्थान विषमतेचे माहेर घर बनला आहे.

जाती व्यवस्थेमुळे हिंदूची सार्वजनिक हितबुध्दी नष्ठ झालेली आहे. हिंदू समाज नितिभ्रष्ठ व दुबळा झाला आहे. आशा परिस्थितीतून हिंदू समाजाला बाहेर काढण्यासाठी डॉ. आंबेडकर रोटी-बेटी चा मार्ग सुचवला आहे. केवळ सहभोजने घेऊन जातिभेदाचे निर्मूलन होणार नाही. त्यासाठी आंतरजातीय विवाह घडवून आणले पाहिजेत. व्यक्तीमध्ये सजातीयतेची भावना वाढीला लागली पाहिजे. जात ही एक भावना असून ती मनाची एक अशी व्यवस्था आहे की ज्यामुळे व्यक्ती ज्यात्याभिमानी बनते. तेंव्हा व्यक्तीला जातिभेदाच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी आंतरजातीय विवाह उपयुक्त ठरेल. असे बाबासाहेबांना वाटत होते हिंदूसमाजातील जन्मजात पुरोहितगिरीची पध्दती बंद करून पुरोहितांचा धंदा सर्व हिंदूना खुला करून दिला पाहिजे. कोणाही हिंदू व्यक्तीला उपाध्यायाची परीक्षा देऊन पुरोहिताची सनद घेता आली पाहिजे. हिंदूंनी धर्मग्रंथ असा एकच निवडावा की जो सर्वांनी प्रमाण मानावा, हिंदू समाजाच्या नैतिक पुनरुजीवनाची आवश्यकता आहे. त्यासाठी हिंदू समाजाला नवे तात्विक अधिष्ठान दिले पाहिजे, हे अधिष्ठान स्वातंत्र्य समता बंधुत्व यावर अधिष्ठित

असले पाहिजे. हिंदू समाज एकवर्णी बनला तरच तो सुरक्षित राहिल. अशा प्रकारे डॉ. आंबेडकर यांनी जातिभेद निर्मूलनाबाबत आपले विचार मांडले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संशोधकवृत्तीचे विचारवंत होते. त्यामुळे भारतातील जातीव्यवस्थेचे विश्लेषण अत्यंत मुद्देसूदपणे आणि पुराव्याचा आधार घेऊन केले आहे. जातीसारख्या अत्यंत क्लीष्ठ अशा विलाष्ट व्यवस्थेचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण त्यांनी केले आहे. त्यांचे भारतीय समजशास्त्रास विशेष योगदान लाभले आहे.

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संशोधक वृतीचे विचारवंत होते त्यामुळे त्यांनी जाती आणि त्याचे दुष्परिणाम याचे मूलगामी विचार मांडून भारतातून जाती अंत केल्यास देशातील प्रत्येक नागरिकास ऐकात्मतेची, ऐकतेची आणि बंधुतेची भावना निर्माण होईल, जातीमुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय निर्माण झालेली दरी मोडण्यासाठी आणि भारत प्रबुद्ध बनविण्यासाठी जाती अंत एकमेव पर्याय असेल असे वरील शोधनिबंधातून दिसून येते.

**संदर्भः**


- Annihilation of Cast-Dr. B.R. Ambedkar
- Cast In India - Dr. B.R. Ambedkar
- आंबेडकर नलिनी पंडित
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ प्रकाशक: म.रा. साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई.
- बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३ (म. शासन, २००२) पृ.३२८
- बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १ भाग ३ (म. शासन, १९७९) पृ.१
- डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल चांगदेव भगवानराव खैरमोडे, सुगाव प्रकाशन पुणे डिसेंबर २०१५
- प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर-समग्र वैचारिक चरित्र डॉ. नरेंद्र जाधव ग्रंथाली प्रकाशन मुंबई २०१४
- कामगार चळवळ आणि डॉ. आंबेडकर प्रदिप गायकवाड, क्षतीज पब्लिकेशन नागपुर २००९
- राष्ट्र निर्माण बाबासाहेब डॉ. आंबेडकर का योगदान भद्रशील रावत, सम्यक प्रकाशन नवी दिल्ली २०